नियमित दिवाणी दावा क्र. २३/२०१३
निशाण क्र. ७९ लगत

**<u>वादींतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ स्वतः वादी क्रमांक ०३ जयवंत गणपत शेडगे यांचा पुढील उलटतपास शपथेवर, प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांचेकडून</u> –**

**४३.** हे म्हणणे खरे आहे की, वादाचा गाळा असलेली इमारत ही फार जुनी इमारत आहे. हे म्हणणे खरे आहे की, १९७७ पासून आजतागायत आम्ही दावा विषयक असलेल्या गाळयाची दुरुस्ती केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दुकान गाळा वापरायोग्य स्थीतीत ठेवणे ही घर मालक म्हणून आमची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर इमारत आता डळमळीत झाली आहे.

**४४.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीचा गाळा ज्या इमारतीत आहे त्याच इमारतीत त्या गाळयाच्या पाठीमागील बाजूस आम्ही राहतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्या भागात आम्ही राहतो त्या भागाची दुरुस्ती आम्ही नगर पंचायतची परवानगी घेवून केली आहे.

**४५.** निलीमा नितीन हेगशेटये ही माझी पुतणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी पुतणी निलीमा ही नगर पंचायत, देवरुखची नगराध्यक्षा होती. हे म्हणणे खरे आहे की, ज्या काळात प्रतिवादी सोबत आमचे वाद सुरू झाले त्यावेळी निलीमा नगर पंचायत देवरुखची सदस्या होती.

**४६.** हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यापूर्वी आम्ही प्रतिवादींना व प्रतिवादींना आम्हाला नोटीस पाठविल्यावर आम्ही नगर पंचायतकडे वादातील दावा दुरुस्त करण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज केला होता. ''वादातील गाळा हा विना परवाना व धोकादायक असल्यामुळे त्याबाबत दुरुस्तीची परवानगी देता येत नाही'' असे नगर पंचायतने आम्हाला कळविले होते, याबाबत मला काही आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी दावा विषयक गाळयाबाबत आमच्या विरुध्द एक दावा दाखल केला होता तो आता डिसमीस झाला आहे. दावा विषयक गाळयाची दुरुस्ती करण्याला आम्ही प्रतिवादींना हरकत करु नये यासाठी प्रतिवादींनी तो दावा दाखल

केला होता, असे काही मला आठवत नाही. त्या दाव्यात आम्ही कैफियत दिली होती, हे मला आठवत नाही.

**४७.** हे म्हणणे खरे नाही की, निलीमा ही माझी पुतणी संबंधीत कालावधीत नगर पंचायत देवरुखची सदस्या असल्याने सदर गाळयाची दुरुस्तीसाठी परवानगी देता येत नाही, असे पत्र आम्ही नगर पंचायतकडून मिळविले.

**४८.** हे म्हणणे खरे आहे की, दावा विषयक गाळयाबाबत प्रतिवादींनी आमच्या विरुध्द जो दावा दाखल केला आहे त्यात दावा विषयक गाळयाचा ताबा मिळावा यासाठी आम्ही प्रतिदावा केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यात मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**(निशाणी ११८ कडील अर्जान्वये प्रतिवादींनी दस्त दाखल करण्याची परवानगी मागितली त्यावर सविस्तर म्हणणे देण्यास वादींनी मुदत मागितली. सबब, प्रकरण तहकूब.)**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.12.11 17:52:13 +0530

**(ब. द. तारे)**

दि.११/१२/२०२४ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Devrukh. |
| Date | : | 11/12/2024 |
| Order signed by the presiding officer on | : | 11/12/2024 |
| Order uploaded on | : | 11/12/2024 |